**आर. सी. सी. क्र.९५८/२००८**
**महाराष्ट्र सरकार वि. योगेश कांबळे**
**निशाणी क्रमांक २२**

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १**
साक्षीदाराचे नाव- उत्तम सिताराम वाळके,
वय. ६१ वर्ष, धंदा.- निवृत्त.

**सरतपास शपथेवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे सरकारी पक्षातर्फे श्रीमती क्रांती कुरळे वकील यांच्यातर्फे सुरु**

सन २००८ मध्ये मी काळेवाडी चौकी व सांगवी पोलिस स्टेशन येथे पी.एस.आय. म्हणून कार्यरत होतो. गुन्हा क्र.३२०/२००८ हा ए.जी. मोते सरदार सहा. फौजदार यांनी नोंदवून ठेवून ठाणे अंमलदार यांच्याकडे देण्यात आला. त्याचा पुढील तपास मी केलेला आहे. आता मला तपास करण्याबाबतचा आदेश दाखविण्यात आला. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. सदर आदेशान्वये मी सदर प्रकरणात तपास केलेला आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. मी फिर्यादीचा जबाबाचे अवलोकन केले. पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. पंचनाम्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. त्यानंतर फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आले. आरोपी यांच्याविरुद्ध सबळ पुरावा आल्याने आरोपी यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. सदर आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2025.09.30 15:21:30 +0530

( श्रीमती अ.ई. आवटी )
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**पिंपरी, पुणे.**

**दिनांक- ३०.०९.२०२५**